जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे

दिनांक : ०३/०७/२०२५

निविदा सुचना

जिल्हा न्यायालय, ठाणे व त्याचे अधिपत्याखालील एकुण ४० आस्थापनांवरील कार्यालयातील कर्मचा-यांकरीता बायोमेट्रिक प्रणाली मशीन चेहरा व हाताचा ठसा (फिंगरप्रिंट) १७ मशीन व हाताचा ठसा (फिंगरप्रिंट) १९ मशीन अशी एकुण ३६ बायोमेट्रिक उपस्थिती प्रणाली मशीनची खरेदी करणे आवश्यक आहे.

जिल्हा न्यायालय, ठाणे व त्याचे अधिपत्याखालील एकुण ४० आस्थापनांवरील कार्यालयातील अंदाजे २००० कर्मचा-यांकरीता नामांकीत कंपनीचे (आधारकार्ड लिंक नसणारे) बायोमेट्रिक उपस्थिती प्रणाली मशीनची खरेदी करण्याकरीता खालील तक्त्यात नमूद केल्यानुसार स्थानिक पुरवठादारांकडुन निविदा/दरपत्रके मागविण्यात येत आहेत. (वेगवेगळ्या कंपन्याचे मशीन असल्यास पुरवठादाराने मशीनकरीता वेगवेगळे दर दयावेत.)

अ.क्र.	बायोमेट्रिक उपस्थिती प्रणाली मशीनचा प्रकार	पुरवठा करण्यात येणा-या मशीनची कंपनीचे नाव	प्रती मशीन रूपये	जी.एस.टी. कर (रूपये)	एकूण रक्कम (रूपये)
१	चेहरा व हाताचा ठसा (फिंगरप्रिंट)				
२	हाताचा ठसा (फिंगरप्रिंट)				

ज्या पुरवठादारांची निविदा/दरपत्रक स्विकृत केली जाईल त्या पुरवठादाराने मागणीपत्र प्राप्त होताच कंपनी व ब्रॅन्ड नुसार १५ दिवसांचे आत बायोमेट्रिक उपस्थिती प्रणाली मशीन प्रत्येक आस्थापनांवर स्वखर्चाने जावून पुरवठा करणे व कार्यान्वित करून देणे पुरवठादारास बंधनकारक राहील.

तरी इच्छुक पुरवठादारांनी दिनांक १४/०७/२०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, ठाणे यांचे नावे निम्नलिखित पत्त्यावर बंद लखोटयात निविदा/दरपत्रक सादर करावयात.

पत्ता :- जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे,
कोर्टनाका, ठाणे (प.) पीन ४००६०१.

सदरबाबत अधिक माहिती घेणेसाठी सहाय्यक अधीक्षक, लेखा व वित्त विभाग, जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे नवीन इमारत चौथा मजला यांचेकडे कामाच्या दिवशी सकाळी १०:३० ते सायंकाळी ५.०० या कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

२/...

दिनांक १४/०७/२०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजल्यानंतर प्राप्त झालेल्या निविदा/दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही. तसेच निविदा स्विकृत करण्याचा अथवा रद्द करण्याचा अधिकार सर्वस्वी मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, ठाणे यांचा राहील.

हुकूमावरुन,

ठाणे.
दि. ०३/०७/२०२५.

DISTRICT COURT

प्रबंधक,
जिल्हा व सत्र न्यायालय,
ठाणे